# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३१/३/२००८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२२) इतिवृत्त

सोमवार दिनांक **३१ मार्च २००८** रोजी मा.सभापती **श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा, महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ५.१० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस उप आयुक्त(म.), नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. संजय शिरसाट
2. श्री. पुरूषोत्तम ठाकुर
3. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
4. श्री. अ. रशीद खान (मामु)
5. श्री. संजय जोशी
6. श्रीमती जयश्री किवळेकर
7. श्री. वसंत नरवडे पाटील
8. श्री. मोहन मेघावाले
9. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
10. मो. जावेद मो. इसाक
11. श्री.हाजी शेरखान अ. रहेमान
12. श्री. अ. साजेद अ. सत्तार

**<u>संवाद :</u>**

श्री.अ.रशिद खान मामू : अस्थापनेवर वर्ग -3 सवंर्गात काही कर्मचारी काम करतात जेष्ठता यादीनुसार श्री. नाटकर, श्रीमती वाघुळे श्री. डी बी साळवे याची अ-क्र. 7,15,28 वर नाव आहे. परंतू प्रमोशन 30 क्र.वर असलेले कर्मचारी यांना दिले. दोन्ही कर्मचारी 1983 ला सेवेत आलेले आहे.ज्यांचे नाव यादीत शेवटी आहे त्यांना प्रमोशन कसे मिळाले.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : श्री.नाटकर यांची प्रमोशनची ऑर्डर विरोधी पक्ष नेता यांनी थांबवीली असे सहा. आयुक्त-1 यांनी श्री. नाटकर यांना सांगितले ते माझेकडे आले होते खुलासा द्यावा.

श्री.अ.रशिद खान : जेष्ठतेचा क्र. 7, 15, 28 सोडून 30 क्रमांक असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रमोशन कोणत्या बेसवर मिळाले जम्पींग वगैरे झाले काय? याचा खूलासा द्यावा.

उपआयुक्त(म) : कुणाच्या ऑर्डर थांबवून ठेवलेल्या नाहीत. ज्याचे जातीचे प्रमाणपत्र वैध होवून आलेले नाही त्यांचे प्रमोशन झालेले नाही. ते वैध होवून आल्यानंतर प्रमोशन बाबत जी समितीची बैठक होईल त्यात त्यांचा विचार केला जाईल.

श्री.अ.रशिद खान : जातीचे प्रमाणपत्र वैध होवून आले नाही तर चुक कुणाची आहे.

उपआयुक्त (म) : प्रमाणपत्र असल्याशिवाय प्रमोशन देता येत नाही.यातील काही कर्मचा-यांना जर प्रमोशन द्यायचे थांबवून ठेवले तर ही कार्यवाही कशासाठी केली. हे तपासून घेण्यात येईल.

श्री.अ.रशिद खान : श्री. नाटकर ज्येष्ठतेनुसार अगोदर असून त्याचे का प्रमोशन झाले नाही. डायरेक्ट क्र. 30 वर असलेल्यांना प्रमोशन कसे दिले.

उपआयुक्त(म) : जम्पींग वगैरे झालेले नाही.प्रमोशनच्या वेळेस ज्यांचे जातीचे प्रमाणपत्र वैध होवून आले नसेल तर ते प्रमोशनला अप्रात्र ठरतात.जातीचे प्रमाणपत्र वैध होवून आल्यानंतर ज्या वेळेस जागा रिक्त होतील त्यावेळेस त्यांचा विचार केला जाईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सेवेत घेते वेळेस कोणत्या बेसीसवर घेतले होते. त्यावेळेस कागदपत्र तपासणी करून घेतले नव्हते का?

श्री.अ.रशिद खान : 25-28 वर्षापासून काम करतात या कालावधीत जात पडताळणी कमेटीकडून प्रमाणपत्र मागविले नाही. आता शासनाच्या जी. आर. नुसार पदोन्नती केली, यादीत शेवटी असलेल्यांना प्रमोशन दिले हे योग्य वाटत नाही.

उपआयुक्त(म) : जागा रिक्त झाल्यानंतर कार्यवाही केली जाईल.

मा.आयुक्त : व्हॅलीडिटीची मागणी प्रशासनाला करावी लागत नाही ती संबधीत कर्मचारी यांनी स्वत:हून आणून दिली पाहिजे. व्हॅलीडिटी मिळणार या अपेक्षेने प्रमोशन देत होतो परंतू शासनाने स्पेशल ऑर्डर काढले की विना व्हॅलीडिटी शिवाय प्रमोशन होणार नाही. त्यानुंसार विना व्हॅलीडिटी शिवाय प्रमोशन देत ही नाही.

श्री.अ.रशिद खान :शासनाचे जीआर नुकताच आलेला आहे. परंतू 25 वर्षापूर्वी तसे नव्हते फक्त प्रमाणपत्र पाहिजे नोकरी मिळत असे. व्हॅलीडिटी साठी सर्वाचे पाठविले काहीचे वैध होवून आले त्यांना प्रमोशन देवून टाकले जे ज्येष्ठ होते ते तसेच राहिले यास जबाबदार कोण असणार आहे.

मा.आयुक्त : ज्यांची व्हॅलीडिटी आली त्यांनाच प्रमोशन देवू शकतो. आणखी काही पद रिक्त आहे त्यांचे व्हॅलीडीटी होवून आल्यानंतर त्यांना प्रमोशन दिले जाईल.

श्री.अ.रशीद खान : सर्वाची यादी पाठविली ज्यांनी पैसे देवून व्हॅलीडीटी करून आणली त्यांना प्रमोशन दिले.

मा. आयुक्त : असे प्रशासनाला म्हणता येणार नाही. ज्यांचे आले त्यांना प्रमोशन दिले.काहीची 10-10 वर्ष व्हॅलीडिटी येणार नाही दुस-यांना थांबविता येत नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : श्री. नाटकर माझेकडे आले त्याची प्रमोशनची ऑर्डर विरोधी पक्ष नेता यांनी रोखविली असे सहा.आयुक्त यांनी त्यांना म्हटले हे कितपत सत्य आहे खुलासा करावा.

श्री.संजय सिरसाट : मा. विरोधी पक्ष नेता यांचेकडे नाटकर गेले म्हणून त्यांचे प्रमोशन थंबविले असे त्यांचे म्हणणे आहे श्री. नाटकर यांचे लेखी घ्यावे. विरोधी पक्षनेता, सहा.आयुक्त तसेच श्री. नाटकर यांचे दोघांचेही समोरासमोर शहानिशा करावी जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : श्री. नाटकर यांनी तीन वेळेस व्हॅलीडिटीचे कागदपत्र सादर केले परंतू आपण विरोधी पक्ष नेता यांचेकडे गेले म्हणून तुझे प्रमोशन होत नाही असे त्यास सांगण्यात आले हे नियमाला धरून नाही

श्री.अ.रशीद खान :तीन ही उमेदवार अनुसुचीत जातीचे त्यातील दोन- चार नंबरचा फरक असता तस पत्र देवून कळवू शकत होतो. तसे केले नाही यादीत शेवटी असलेल्यांना प्रमोशन दिले आगोदरचे मागे राहिले हे योग्य नाही.

मा.आयुक्त : व्हॅलीडिटीसाठी किती दिवस थांबायचे असा प्रश्न येतो.

श्री.अ.रशीद खान :एवढे कालावधी गेला संबधीत विभागास प्रशासनाने पत्र देवून कार्यवाही करावयास पाहिजे होते 8-10 दिवस थांबवून कार्यवाही व्हायला पाहिजे होते.

श्री.मो.जावेद मो.इसहाकः जुन्या शहरातील चेलीपूरा भागातील काही जागा भुसंपादीत केल्या त्यांचा मोबदला लोकांना दिला असे असतांना ती जागा अदयाप महापालिकेच्या ताब्यात नाही. ट्राफिक वाढलेली आहे. नागरीकांना त्रास होत आहे.

मा.आयुक्त : महापालिकेच्या जागा शोधण्यासाठी व त्या नावावर करून घेणेसाठी या सेवानिवृत्त असलेले अनुभवी लोकांची नियुक्ती केली होती. ज्याची जागा घेतली त्यावर महापालिकेचे नाव लावून घ्यावे 500 वर जागेवर नाव लावलेले आहे. ज्यांना मोबदला दिला त्यांचेकडून ताबा घेतला नाही त्याची पण कार्यवाही सुरू करण्यात येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : चेलीपूरा येथील जागेवरील रिकामी करू नये म्हणून काही लोकांनी मा.उच्च न्यायालयाचे आदेश आणले होते. असे असतांना महापालिकेने त्यावर 50 लक्ष मोबदला दिला. आता लोकानी मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आणले आता महापालिकेचे नाव लागणार नाही पजेशनही मिळणार नाही. या प्रकरणात जे ही दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही होणार आहे का? आतापर्यत महापालिकेने मा.सर्वोच्च न्यायालयात पूढील काहीही कार्यवाही केली नाही.मा. उच्च

न्यायालयाचे स्थगिती आदेश असतांना 54 लक्ष देण्याची महापालिकेला का गरज पडली. ताबा घेतला नाही रक्कम का दिली.

श्री.हिम्मतराव दाभाडे : मुथीयान कॉर्नर येथील माधवराव घोरपडे यांनी अतिक्रमण संबधी अनेक वेळा चर्चा झाली.या संबधी एक अहवाल मागविला बाधकाम परवाना ,पीआर कार्ड रू.1.82610 मोबदला हा नजर चुकीने दिला असे म्हटले आहे शहरात अनेक ठिकाणी महापालिकेच्या जागा आहे त्या महापालिकेने ताब्यात घ्याव्यात म्हणून अनेक वेळा मागणी केली आहे. वार्ड क्र. 90 एकनाथनगर भागात जागा आहे त्या ठिकाणी भाजी मंडई साठी शॉपीग सेंन्टर तसेच इतर कमर्शियल दुकाने काढली तर निश्चितच महापालिकेला उत्पन्न होईल त्या संबधी निवेदन देत आहे कार्यवाही करावी अशी विनंती आहे.

मा.आयुक्त : घेतलेली बांधकाम परवानगी रद्द केलेली आहे. जो ठराव स्थायी समितीने केला होता. तत्कालीन आयुक्त यांनी आदेशीत केले होते की रद्द करावे ते रद्द करण्यासाठी पाठविले नव्हते तेही पाठविले आहे. महापालिकेच्या वतीने जी काही कार्यवाही करायची होती ती सर्व केली आहे. ब-याच जागेवर महापालिकेचे नाव लागलेले आहे. कार्यवाही चालू आहे.

मा.सभापती : स. सदस्य श्री. दाभाडे हिम्म्तराव यांनी केलेली सूचनेची दखल घेवून कार्यवाही करावी.

मा.सभापती : विषय क्र. 476 ते 485 ला मंजूरी देण्यात येते.

**<u>विषय क्र. 476 :</u>**

(दि.15/3/2008 च्या सभेती स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र. **452**)

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्ताव सादर करत आहे की, संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान सन 2005-06 मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेमधून वॉर्ड (ड) ची निवड होऊन रक्कम रू.5.00 लक्ष चे प्रथम पारितोषिक वॉर्ड ड कार्यालयास प्रदान करण्यात आले आहे. धनादेश क्र.850163 दि.19/5/2007 नुसार रक्कम महानगरपालिका फंडात जमा करण्यात आलेली आहे. जमा रक्कमेच्या विनियोगाबाबतचे शासन निर्देश मार्गदर्शक सुचनानुसार खालीलप्रमाणे सदर रक्कम खर्च करणे बाबतचा प्रस्तावीत नियोजन/विनियोगास मा.आयुक्तांची प्रशासकीय मान्यता दि.1/11/2007 रोजी झाली असून या मध्ये शासन निर्देश मार्गदर्शक सुचनानुसार बक्षिसाच्या रक्कमेचा विनियोग बक्षिस मिळालेल्या क्षेत्रासाठी करणे आवश्यक असून या रक्कमेच्या विनियोगा बाबत मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करीता खालील प्रमाणे खर्च/विनियोग करण्याचे कार्यवाहीस मा.स्थायी समितीची मान्यता व्हावी म्हणून प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | बक्षीस रक्कमेच्या 5% रक्कम रू.25,000/- | अभियान प्रचारासाठी |
| 2 | बक्षीस रक्कमेच्या 5% रक्कम रू.25,000/- | प्रशासन व कार्यालयीन खर्च |
| 3 | बक्षीस रक्कमेच्या 15% रक्कम रू.75,000/- | वैयक्तिक लाभ यामध्ये महिला, युवक, विद्यार्थी व नागरी स्वच्छता योजनेत उत्कृष्ट काम करणाऱ्या नागरीकांना देता येईल. |
| 4 | बक्षीस रक्कमेच्या 50%<br>रक्कम रू.2,50,000/- | संबंधीत क्षेत्रातील महिला, मुले यांचेसाठी व विशेषतः झोपडपट्टी भागात सार्वजनिक शौचालय बांधकाम/दुरूस्ती देखभाल करीता खर्च करता येईल. |
| 5 | व उर्वरीतरक्कम रू.1,25,000/- | सार्वजनिक कामाकरीता ज्यामध्ये पाणी शुध्दता तपासणी उपकरणे, किटकनाशक खरेदी, ड्रेनेज, कचराकुंड्या, वृक्षारोपण इ. करीता खर्च करण्यात येईल. |

यानुसार रक्कम रू.2,50,000/- करीता प्रभाग ड मधील सार्वजनिक शौचालय दुरूस्ती, देखभाल/नवीन बांधकाम इ.साठी मा.स्थायी समितीची मान्यता झाल्यानंतर सविस्तर अंदाजपत्रक सादर करून काम करण्यात येईल.

वरील 1, 2, 3 करीताचा एकत्रित खर्च रक्कम रू.1,25,000/- व 4 करीताचा खर्च रक्कम रू.2,50,000/- असा एकूण रू.3,75,000/- खर्च वजा जमा उर्वरीत रक्कम रू.1,25,000/- मध्ये पाणी शुध्दता तपासणी उपकरणे, किटकनाशके खरेदी, ड्रेनेज, कचराकुंड्या, वृक्षारोपण इ. कामे करण्यात येतील.

तरी उक्त खर्च विनियोगास मा.स्थायी समितीचा निर्णय होऊन मान्यता होणे आवश्यक आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही करणे योग्य वाटते. मान्यतेनंतरच्या पुढील कार्यवाही करीता प्रस्तावित करण्यात येते की, उक्त विनियोग नियोजन/रक्कम अलॉटमेंट नंतर त्या रक्कमेच्या मर्यादेत निर्णय घेवून प्रत्यक्ष कार्यवाही करण्याबाबत त्यातील विविध कामाकरीता रक्कम विभाजन करणे, त्या रक्कमेच्या खर्चास प्रत्यक्ष मंजुरी व रक्कम खर्च करण्याची कार्यवाही इ. संबंधाने पुढील सर्व कार्यवाही बाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा.सभापती, प्रभाग समिती (ड) यांना देण्यात यावे. जेणे करून उक्त प्रस्तावानुसार प्रत्यक्ष कार्यवाहीवर विनियोग करणे सोईचे होईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान सन 2005-06 मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेमधून वॉर्ड (ड) ची निवड होऊन वॉर्ड ड कार्यालयास रक्कम रू.5.00 लक्ष चे मिळालेले प्रथम पारितोषिकाच्या रक्कमेतून प्रस्तावात नमुद केल्यानुसार रक्कम रू.2,50,000/- प्रभाग ड मधील सार्वजनिक शौचालय दुरूस्ती, देखभाल/नवीन बांधकाम इ.साठी विनियोग करण्यास तसेच प्रस्तावात नमुद केलेल्या तक्त्यातील 1, 2, 3 करीताचा एकत्रित खर्च रक्कम रू.1,25,000/- व 4 करीताचा खर्च रक्कम रू.2,50,000/- असा एकूण रू.3,75,000/- खर्च वजा जमा उर्वरीत रक्कम रू.1,25,000/- मध्ये पाणी शुध्दता तपासणी उपकरणे, किटकनाशके खरेदी, ड्रेनेज, कचराकुंड्या, वृक्षारोपण इ. कामे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 477 :</u>**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरास जायकवाडी उद्‌भवावरून 700 व 1219 मी.मी. व्यासाच्या वाहिन्यांद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. योजने अंतर्गत वरील वाहिन्यांवर खालील प्रमाणे फ्लोमीटर बसविण्याच्या कामाला वैधानिक रित्या मान्यता प्राप्त झालेली आहे.

1) जायकवाडी येथे 700 व 1219 मी.मी. वाहिनीवर Insertion type व दैनंदिन देखभालीसाठी Portable Ultra sonic Flowmeters पुरविणे/बसविणे - किंमत 13,10,100.00
2) नक्षत्रवाडी येथे 700, 1200, 1400 मी.मी. शुध्द वाहिनीवर Insertion type Ultra sonic Flowmeters पुरविणे/बसविणे - किंमत 13,40,000.00

अ.क्र. 1 च्या कामाला दिनांक 7/8/07 रोजीच्या स्थायी समिती सभेने विषय क्र.82 नुसार मान्यता प्रदान केली असून, अ.क्र. 2 च्या कामाला दिनांक 27/11/07 रोजीच्या स्थायी समिती सभेने विषय क्र.241 नुसार मान्यता प्रदान केली आहे. उपरोक्त दोन्ही कामांना वेगवेगळ्या लेखाशिर्षांतर्गत लेखाशाखेने मान्यता दिली होती. त्यामुळे उपरोक्त दोन्ही कामे एकाच प्रकारची असल्यामुळे एकत्रित निविदा काढण्याबाबतही लेखा विभागाने सुचीत केले. त्यानुसार, उपरोक्त दोन्ही कामाच्या एकत्रित रक्कम रू.26,50,100/- किंमतीच्या कामाची एकच निविदा काढण्यासाठीचा प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर ठेवण्यात आला असता, त्यालाही दि.27/11/07 रोजीच्या स्थायी समिती सभेने विषय क्र.241 नुसार मान्यता प्रदान केली आहे.

मंजुरीनुसार मनपा ई-निविदा विभागातर्फे निविदा सुचना क्र.14-07-20-A नुसार निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदा विक्री व प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | प्राप्त निविदा दर |
|---|---|---|
| 1 | चेतस कंट्रोल सिस्टीम प्रा.लि. | 16.00% कमी |
| 2 | राईट कंट्रोल अँड इन्स्ट्रुमेंट | 9.50% जास्त |
| 3 | इंडरेस + हाऊझर | 11.50% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या कमी दर हे चेतस कंट्रोल सिस्टीम प्रा.लि. यांचे निविदा दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 16.00% कमी प्राप्त झालेले आहेत. तरी चेतस कंट्रोल सिस्टीम प्रा.लि. यांच्याकडून काम करून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरास जायकवाडी उद्‌भवावरून 700 व 1219 मी.मी. व्यासाच्या वाहिन्यांद्वारे पाणी पुरवठा योजने अंतर्गत वरील वाहिन्यांवर खालील प्रमाणे फ्लोमीटर बसविण्याच्या कामाकरीता -

1. जायकवाडी येथे 700 व 1219 मी.मी. वाहिनीवर Insertion type व दैनंदिन देखभालीसाठी Portable Ultra sonic Flowmeters पुरविणे/बसविणे - किंमत 13,10,100.00

2. नक्षत्रवाडी येथे 700, 1200, 1400 मी.मी. शुध्द वाहिनीवर Insertion type Ultra sonic Flowmeters पुरविणे/बसविणे - किंमत 13,40,000.00

अशा एकत्रित रक्कम रूपये 26,50,100/- किंमतीच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 16.00% कमी दराचे निविदाधारक चेतस कंट्रोल सिस्टीम प्रा.लि. यांचेकडून सदरील काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 478 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.48 अविष्कार कॉलनी येथील मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.9,85,900/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता एकूण 4 निविदा पत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 4 निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| 1 | के. बी. पाथ्रीकर | 19.21% जास्त दराने |
| 2 | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 20.20% जास्त दराने |
| 3 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 21.21% जास्त दराने |
| 4 | चंद्रम्मा आशन्ना | 22.00% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी के. बी. पाथ्रीकर यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 19.21% ने जास्त आहेत. सदर दराची डांबर खरेदीचे बाजारभावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता 23.10% जास्त दर येत आहे. परंतु गुत्तेदाराने मुळ दर हे बाजार भाव दरापेक्षा कमी म्हणजे अं.प.दरापेक्षा 19.21% जास्त दर आहे. त्यामुळे कामावर प्रत्यक्ष खर्च रू.11,75,255/- एवढा होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी के. बी. पाथ्रीकर यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 19.21% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.48 अविष्कार कॉलनी येथील मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 19.21% जास्त दराची के. बी. पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 479 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.92 कबीरनगर अंतर्गत नागसेननगर ते त्रिभुवन चौक ते रेल्वे क्रॉसिंग पर्यंत रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,97,700/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता एकूण 3 निविदा पत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 3 निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| 1 | अरोरा कन्स्ट्रक्शन | 20.12% जास्त दराने |
| 2 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 21.21% जास्त दराने |
| 3 | चंद्रम्मा आशन्ना | 21.70% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी सर्वात कमी दर अरोरा कन्स्ट्रक्शन यांचे असून त्यांच्या निविदेचे दर अं.प.दरापेक्षा 20.12% ने जास्त आहेत. त्यामुळे कामावर प्रत्यक्ष खर्च रू.17,99,037/- एवढा होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी अरोरा कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 20.12% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.92 कबीरनगर अंतर्गत नागसेननगर ते त्रिभुवन चौक ते रेल्वे क्रॉसिंग पर्यंत रस्त्यांचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्म्कदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 20.12% जास्त दराची अरोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 480 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.50 सुराणानगर अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.16,97,800/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता एकूण 6 निविदा पत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 6 निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| 1 | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 21.00% जास्त दराने |
| 2 | राजेंद्रसिंग अजितसिंग | 32.33% जास्त दराने |
| 3 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 35.10% जास्त दराने |
| 4 | एम. ए. सिद्यीकी | 36.86% जास्त दराने |
| 5 | चंद्रम्मा आशन्ना | 40.00% जास्त दराने |
| 6 | अरोरा कन्स्ट्रक्शन | 40.12% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 21.00% ने जास्त आहेत. सदर दराची डांबर खरेदीचे बाजारभावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता 23.98% जास्त दर येत आहे. परंतु गुत्तेदाराने मुळ दर हे बाजार भाव दरापेक्षा कमी म्हणजे अं.प.दरापेक्षा 21.00% जास्त दर आहे. त्यामुळे कामावर प्रत्यक्ष खर्च रू.20,33,751/- एवढा होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 21.00% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.50 सुराणानगर अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 21.00% जास्त दराची ए. एस. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 481 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.05 आसेफिया कॉलनी येथे बीबीका मकबरा ते स्मशानभुमी ते आसाराम बापु आश्रम रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.9,94,954/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता एकूण 4 निविदा पत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 4 निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| 1 | चंद्रम्मा आशन्ना | 26.00% जास्त दराने |
| 2 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 35.10% जास्त दराने |
| 3 | एम. ए. सिद्यीकी | 36.86% जास्त दराने |
| 4 | राजेंद्रसिंग अजितसिंग | 40.00% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी चंद्रम्मा आशन्ना यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 26.00% ने जास्त आहेत. सदर दराची डांबर खरेदीचे बाजारभावाप्रमाणे दर विचारात घेवून तुलना केली असता 23.29% जास्त दर येत आहे. परंतु गुत्तेदाराचे दर हे बाजार भाव दरापेक्षा 26.00% जास्त दर असल्यामुळे सदरील कामावर रक्कम रू.12,08,942/- एवढा होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी चंद्रम्मा आशन्ना यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 23.29% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.05 आसेफिया कॉलनी येथे बीबीका मकबरा ते स्मशानभुमी ते आसाराम बापु आश्रम रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्म्कदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 23.29% जास्त दराची चंद्रम्मा आशन्ना यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 482 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.74 अंतर्गत संघर्षनगर व ज्ञानेश्वर कॉलनी मुख्य भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.28,97,880/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदर कामाचे निविदापत्रके मागविली असता एकुण 4 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 4 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यातआली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | एम. ए. सिद्यीकी | 29.86% जास्त दराने |
| 2. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 35.10% जास्त दराने |
| 3. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 38.00% जास्त दराने |
| 4. | राजेंद्रसिंग अजितसिंग | 40.00% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी एम. ए. सिद्यीकी यांचे दर अं.प.दरापेक्षा 29.86% ने जास्त आहेत. त्यामुळे कामावर प्रत्यक्ष खर्च रू.37,62,288.34 एवढा होणार आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी एम. ए. सिद्यीकी यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 29.86% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.74 अंतर्गत संघर्षनगर व ज्ञानेश्वर कॉलनी मुख्य भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक एम. ए. सिद्यीकी यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 29.86% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 483 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, बारापुल्ला या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे या कामाचे अंदाजपत्रक रू.12,45,000/- चे असून या कामाची ई-निविदा विभागातर्फे निविदा मागविण्यात आल्या असता, एकुण 3 निविदापत्रक विक्री झाले व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 3 निविदा दरपत्रक प्राप्त झाले. सदर कामाच्या निविदेचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | शेख मसुद शेख अमीन | 8.35% कमी दराने |
| 2. | मुबारक महेबुब पठाण | 8.25% कमी दराने |
| 3. | गायत्री कन्स्ट्रक्शन | 5.00% कमी दराने |

तुलनात्मकरित्या सर्वात कमी दराची निविदा शेख मसुद शेख अमीन यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.35% कमी दराने आहे. सदर दरास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी शेख मसुद शेख अमीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.35% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बारापुल्ला या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 8.35% कमी दराची शेख मसुद शेख अमीन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 484 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, जाफरगेट या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे या कामाचे अंदाजपत्रक रू.10,19,000/- चे असून या कामाची ई-निविदा विभागातर्फे निविदा मागविण्यात आल्या असता, एकुण 3 निविदापत्रक विक्री झाले व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 3 निविदा दरपत्रक प्राप्त झाले. सदर कामाच्या निविदेचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मुबारक महेबुब पठाण | 5.35% कमी दराने |
| 2. | शेख मसुद शेख अमीन | 5.25% कमी दराने |
| 3. | गायत्री कन्स्ट्रक्शन | 4.00% जास्त दराने |

तुलनात्मकरित्या सर्वात कमी दराची निविदा मुबारक महेबुब पठाण यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.35% कमी दराने आहे. सदर दरास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी मुबारक महेबुब पठाण यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.35% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाफरगेट या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 5.35% कमी दराची मुबारक महेबुब पठाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 485 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र. 87 उल्कानगरी येथील मनपाच्या मोकळ्या जागा विकसीत करणे करीता सा.बां.विभागाच्या सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रूपये 20,97,454/- लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास सर्वसाधारण सभेने ठराव क्र.46 अन्वये दि.20/12/2007 च्या सभेमध्ये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकुण 4 निविदा विक्री झाल्या व 4 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | काझी म.फारूख म.इस्माईल | 21.00% कमी दराने |
| 2. | महेश राजपुत | 20.50% कमी दराने |
| 3. | टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | 10.56% कमी दराने |
| 4. | संतोष झाल्टे | 4.77% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.00% कमी दराची निविदा काझी म.फारूख म. इस्माईल यांची प्राप्त झालेली आहे. त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

त्यानुसार काझी म. फारूख म. इस्माईल यांची अं.प.दरापेक्षा 21.00% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. 87 उल्कानगरी येथील मनपाच्या मोकळ्या जागा विकसीत करणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 21.00% कमी दराची काझी म. फारूख म. इस्माईल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 486 :**

उप आयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की, सन 2008-09 (1/4/08 ते 31/3/09) या एका वित्तीय वर्षा करीता महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील प्राण्यांकरीता बीफ (खन्नी) खरेदी करणे करीता ई-टेंडर द्वारा निविदा मागविण्यात आल्या असता एकुण 9 कोरे निविदा फॉर्मची विक्री झाली असून त्यापैकी दर भरलेल्या एकुण 6 निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | भाव/प्रति किलो |
|---|---|---|
| 1. | श्री. अब्दुल हमीद शेख हनीफ | रू. 23.00 |
| 2. | श्री. अबदुल करीम अब्दुल रहीम | रू. 27.00 |
| 3. | श्री. फिरोजखन रहेमानखान | रू. 28.00 |
| 4. | श्री. मो.सलीम मो. हनीफ | रू. 33.00 |
| 5. | श्री. शेख अयाज शेख अ. रहीम | रू. 36.00 |
| 6. | श्री. जहिर गफुर कुरैशी | रू. 39.00 |

तुलनात्मकदृष्टीने सर्वात कमी दर श्री.अब्दुल हमीद शेख हनीफ यांचे असून रू.23.00 प्रति किलो असे आहेत. या दरास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.अ.रशिद खान | : वाघ, सिंह, बदक व इतर कोणते व किती प्राणी आहेत. |
| संचा.प्रांणीसंग्रहालय | : 10 पांढरे वाघ, चार पिवळे वाघ, दोन लायन दोन पॅथंर आहेत. चित्ता 2 आहेत. |
| श्री.अ.रशिद खान | : वाघ सिंह यांना दररोजचे किती बिफ लागते. |
| प्र.संचा.प्रांणीसंग्रहालय | : वाघांना दररोज 10-12 किलो, पॅंथरला 5 किलो. |
| श्री.अ.रशिद खान | : टेंडर काढल्यानंतर तीन वाघांचा मृत्यू झाला आता 35 कि. कमी बिफ लागेल. |

प्र.संचा.प्राणीसंग्रहालय : किती लागेल यांचे ऍव्हरेज नुसार खर्च होणार आहे वर्षासाठी 15 लक्ष खर्च अपेक्षीत आहे.

श्री.अ.रशिद खान : शहरात बिफ 70-80 प्रति कि. प्रमाणे मिळते. टेंडरमध्ये 21 प्रमाणे घेत आहोत बिफ घेतांना हाड जास्त प्रमाणात नसावे. यावर दोन तीन लोकांची कमेटी करावी अशी विनंती.

मा. सभापती : प्राण्यांना चांगले खाद्य उपलब्ध व्हावे यासाठी तीन सदस्यीय समिती नियुक्त करण्यात येते. त्यात विभाग प्रमुख, स.सदस्य श्री.नासेर नाहदी, श्री.मो.जावेद मो. इसहाक श्री.अ.रशिद खान मामू हे राहतील.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे सन 2008-09 (1/4/08 ते 31/3/09) या एका वित्तीय वर्षा करीता महानगरपालिका प्राणी संग्रहालयातील प्राण्यांकरीता बीफ (खन्नी) खरेदी करणे करीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.अब्दुल हमीद शेख हनीफ यांचेकडून रू. 23.00 प्रति किलो या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 487 :**

उप आयुक्त(महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, अग्निशमन दलासाठी साहित्य खरेदी करण्यासाठी तीन वेळा राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आलेली होती. तसेच ई-टेंडर विभागामार्फतही दर मागविण्यात आलेले होते. अग्निशमन दलासाठी खालील प्रमाणे 14 प्रकारचे साहित्य खरेदी करणे आहे.

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | संख्या/नग |
|---|---|---|
| 1. | हाय एक्सपान्शन फोम एक्झॉस्टर | 01 |
| 2. | शार्पेक्स वुड कटर | 01 |
| 3. | बोल्ट कटर | 12 |
| 4. | पायरो प्रोटेक्ट ब्रँड डिलीव्हरी होज पाईप-15 मीटर लांब | 60 |
| 5. | फायर चिफ बँड डिलीव्हरी होज पाईप-15 मीटर लांब | 60 |
| 6. | फायर चिफ बँड डिलीव्हरी होज पाईप-30 मीटर लांब | 60 |
| 7. | ब्रँच पाईप गन मेटल | 12 |
| 8. | न्यु लाईट फायर नोजल | 12 |
| 9. | फॉग नोजल | 12 |
| 10. | रिव्हॉल्व्हींग नोजल | 12 |
| 11. | ब्रिचींग डिव्हायडींग | 12 |
| 12. | ब्रिचींग कलेक्टींग | 12 |
| 13. | अडाप्टर्स कपलींग - मेल | 12 |
| 14. | अडाप्टर्स कपलींग - फिमेल | 12 |

वरील सर्व साहित्य खरेदी करण्यासाठी इस्टीमेटेड दर रूपये 28,44,120/- आहेत. सदर साहित्य खरेदी संदर्भाने वृत्तपत्रात तीन वेळा जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरील दर हे सन 2005 चे असून कॉपरचे तसेच गन मेटलचे दर वाढल्यामुळे तसेच सदर दरवाढीबाबत पुरवठा धारकाने केलेले दराचे पृथ:करण संयुक्तीक वाटते. उपरोक्त साहित्य खरेदीसाठी इस्टीमेटेड दरापेक्षा 20.62% जास्त दर, शाह भोगीलाल जेठालाल ॲन्ड ब्रदर्स, अहमदाबाद यांचे प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे उपरोक्त साहित्य खरेदीसाठी रूपये 34,29,160/- एवढा खर्च अपेक्षित आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे अग्निशमन दलासाठी साहित्य खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्याशाह भोगीलाल जेठालाल ॲन्ड ब्रदर्स, अहमदाबाद यांचे निविदा दरानुसार प्रस्तावात नमुद केलेले साहित्य त्यांचेकडून अं.प. दरापेक्षा 20.62% जास्त दराने खरेदी करण्यास तसेच यासाठी लागणाऱ्या एकुण रक्कम रू.34,29,160/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 488 :**

दिनांक 5-2-2008 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र. 326 मधील मुद्दा क्र.5, 8, 9, 10 व 11 हा स्थगित ठेवण्यात आला होता. सदरील मुद्दे हे महानगरपालिकेचया मालकीचे विविध ठिकाणी असणारे व्यापारी संकुलातील दुकाने, हॉल भाड्याने देण्यासाठी भाडे दर निश्चिती करणे आवश्यक आहे.

सविस्तर इमारत व स्थळा ानुसार सिध्द शिघ्र गणकाचे दर सन 2007 नुसार मुल्यांकन करून भाडे समितीने दर निश्चित कले आहेत. सदरील दर हे मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करीत आहे.

1. न.भु.क्र.15302/12 मौजे गारखेडा येथील नुपूर अपार्टमेंट जवळील महानगरपालिकेच्या मालकीचे यापारी संकुलातील तळमजल्यावरील 09 दुकाने व व्यावसायिक हॉल भाडेतत्वावर देण्यासाठी एकूण रू.76/- प्रती चौ.मी. प्रती माह आकारणे योग्य.
2. न.भु.क्र.19381/8, 19381/8/1/अ, मौजे बन्सीलालनगर येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व्यापारी संकुलातील तळमजल्यावरील दुकाने व व्यावसायिक हॉलसाठी रू.200/-, पहिल्या मजल्यावरील दुकानांसाठी रू.225/- व दुसऱ्या मजल्यावरील दुकानांसाठी रू.150/- प्रती चौ.मी. प्रती माह आकारणे योग्य.
3. न.भु.क्र.19149 रेल्वे स्टेशन संत गाडगे महाराज व्यापारी संकुलातील दुकान क्र.1 च्या बाजुला असलेले दुकानाचे क्षेत्रफळ 7.50 चौ.मी. असून रू.100/- प्रती चौ.मी. प्रती माह आकारणे योग्य.
4. न.भु.क्र.800 मौजे चिकलठाणा येथील महानगरपालिकेची झोन कार्यालयाची जुनी इमारत मधील पहिला मजला ज्याचे क्षेत्रफळ 174.08 चौ.मी. अध्यक्ष, संत भगवानबाबा शिक्षण प्रसारक मंडळ यांना रू.48/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भाडेतत्वावर देणे योग्य.
5. न.भु.क्र. 15297/पी मौजे छत्रपतीनगर गारखेडा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे सांस्कृतिक सभागृह ज्याचे क्षेत्रफळ 105.82 चौ.मी. अध्यक्ष, छत्रपती नगर सामाजिक संस्था, औरंगाबाद यांना रू.64/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भाडेतत्वावर देणे योग्य.

वरील जागासाठी येणाऱ्या मासिक भाड्याच्या 12 पट अनामत रक्कम म्हणुन आकारणे योग्य. तसेच नियमाप्रमाणे जो मालमत्ता कर, पाणीपट्टी कर, विद्युत कर जो येईल तो संबंधीतास दुकान/हॉलच्या भाड्याच्या व्यतिरिक्त व सेवा शुल्क रक्कम रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह भरणा करावा लागेल.

करीता सुधारीत प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| मा.सभापती | : संबधीत अधिकारी यांनी खूलासा करावा. |
| मा. आयुक्त | : मालमत्ता अधिकारी श्री. कालेले कामानिमित्त मुंबईला गेलेले आहे. त्यांचे संबधीत 488, 489 विषय आहे.दोन्ही स्थगित ठेवावे. |
| मा.सभापती | : विषय क्र. 488 स्थगित ठेवण्यात येतो. |

**<u>ठराव :</u>**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. 489 :</u>**

दिनांक 5-2-2008 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.326 मधील मुद्दा क्र. 1 हा स्थगित ठेवण्यात आला होता. त्याबाबत सविस्तर प्रस्ताव ठेवणेसाठी सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार रस्ता रूंदीकरणाबाबत नगर रचना विभागाचा अभिप्राय घेवून खालील प्रमाणे फेर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

1. महानगरपालिका हद्दीतील विविध भागातील अतिक्रमण विभागातील काढण्यात आलेल्या टपरी धारकांना जागा देण्यासाठी एकनाथनगर भागात फुलेनगर टी पॉइंट ते वेदांतनगरकडे जाणाऱ्या 24 मीटर रस्त्यालगत व शासकीय तंत्रनिकेतन वस्तीगृहाच्या कुंपण भिंतीलगत स्टॉल धारकांस 2.4 x 2.7 मीटर म्हणजेच 6.48 चौ.मी. क्षेत्राची जागा भाड्याने द्यावयाची झाल्यास सन 2007 च्या सिध्द शिघ्र गणकानुसार रू.70/- प्रती चौ.मी. दर आकारण्यात येईल. तरी या दरास मान्यता मिळणे आवश्यक आहे. तसेच सदर जागा देताना एक वर्षाचे भाडे आगाऊ भरणा करून घेणे व अनामत रक्कम रू.1000/- प्रती चौ.मी. आकारण्यात येईल. नियमाप्रमाणे जो मालमत्ता कर भाड्या व्यतिरिक्त भरावा लागेल, शिवाय सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह भरावा लागेल.
2. दिनांक 5-2-2008 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.326 मधील मुद्दा क्र.2, 3 व 4 हे महानगरपालिकेने शाळेसाठी खाजगी व्यक्तीकडून जागा भाड्याने घेण्याबाबतचे आहे. त्याचे भाडे ठरविण्यासाठीचे भाडे दर निश्चितीसाठी मा.स्थायी समिती समोर सदर प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

   01. मोहल्ला विठ्ठलनगर येथील खाजगी व्यक्ती श्री. अण्णासाहेब दौलतराव राऊत यांच्या मालकीच्या दोन खोल्या भाड्याने घेतल्या आहेत. सदरील दोन खोल्यांचे भाडे खालील प्रमाणे दर्शविण्यात येते.

   अ) खोलीचे लोडबेरींग मध्ये असलेल्या बांधकामाचे क्षेत्रफह 18.88 चौ.मी. असून रू.47/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भाडे संबंधीतास देणे योग्य राहील.

ब) खोलीचे आर.सी.सी. कॉलममध्ये असलेल्या बांधकामाचे क्षेत्रफळ 9.45 चौ.मी. व खोलीचे चटई क्षेत्र 7.87 चौ.मी. असून रू.66/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भाडे एवढे येते.

02. मोहल्ला बेगमपुरा येथील खाजगी व्यक्ती श्री.अलीम खान यासिन खान यांचेकडून महानगरपालिकेच्या शाळेसाठी खोल्या भाडेतत्वावर घेणेसाठी रक्कम रू.39/- प्रती चौ.मी. प्रती माह संबंधीतास देणे योग्य राहील.

03. मौजे पडेगांव येथील खाजगी व्यक्ती श्रीनंद छोटीराम वाणी यांच्याकडून महानगरपालिकेने शाळेसाठी भाडेतत्वावर घेणेसाठी रक्कम रू.53/- प्रती चौ.मी. प्रती माह भाडे देणे योग्य राहील.

पाणीपट्टी व मालमत्ता कर संबंधीत मालकास भरावा लागेल व विद्युत देयक महानगरपालिका भरेल. तरी वरील भाडे दर प्रती माह प्रति चौ.मी. आकारणे योग्य.

करीता सुधारीत प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

## ऐनवेळचे विषय

**संवाद :**

मा.सभापती : ऐनवेळचे सर्व विषय मंजुर करण्यात येतात.

**विषय क्र. 490 :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, श्री. प्रताप रामराव निंबाळकर हे औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वाहन चालक या संवर्गात कार्यरत असून अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, औरंगाबाद च्या वैद्यकीय मंडळाने त्यांचे पत्र क्र.जीबी/एमबी/एमसीएच/1170-71/2007, दि.1/10/2007 अन्वये श्री.प्रताप रामराव निंबाळकर, यांना दमा (Asthma) असल्यामुळे वैद्यकीय मंडळाने त्यांना **वाहन चालक** या पदावर काम करण्यास अपात्र (Unfit) ठरविले आहे. परंतु कार्यालयीन कामकाज (Office Table Work) करण्यासाठी सक्षम असल्याची शिफारस केली आहे.

श्री. प्रताप रामराव निंबाळकर, यांना सध्या वाहन चालक या पदाची वेतनश्रेणी देण्यात येत असून, त्यांची सेवा लिपीक संवर्गात वर्ग केल्यास लिपीक संवर्गाची व वाहन चालक संवर्गाची वेतनश्रेणी एकच असल्याने त्यांना कोणतेही इतर फायदे होणार नसल्याने महानगरपालिकेच्या आस्थापनेवर आर्थिक बोजा पडणार नाही. तसेच त्यांची सेवा ही लिपीक संवर्गात वर्ग झाल्याच्या आदेशाचे तारखेपासून त्यांना लिपीक संवर्गाची ज्येष्ठता सेवा लागू राहील.

करीता वैद्यकीय मंडळाने केलेली शिफारस व महाराष्ट्र नागरी सेवा (सर्वसाधारण शर्ती) 1981 चे कलम 27 (1) (ड) नुसार विशेष बाब म्हणून श्री.प्रताप रामराव निंबाळकर यांची सेवा वाहन चालक संवर्गातून लिपीक संवर्गात करण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वाहन चालक या संवर्गात कार्यरत असलेले श्री. प्रताप रामराव निंबाळकर यांना दमा (Asthma) असल्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, औरंगाबादच्या वैद्यकीय मंडळाने **वाहन चालक** या पदावर काम करण्यास अपात्र (Unfit) ठरविल्यानुसार आणि कार्यालयीन कामकाज (Office Table Work) करण्यासाठी सक्षम असल्याची शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सर्वसाधारण शर्ती) 1981 चे कलम 27 (1) (ड) नुसार विशेष बाब म्हणून श्री.प्रताप रामराव निंबाळकर यांची सेवा वाहन चालक संवर्गातून लिपीक संवर्गात करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 491 :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मौजे पडेगांव येथील गट नंबर 47/पैकी जमीन औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार 15 मीटर व 12 मीटर रूंद रस्ता या प्रस्तावाने बाधीत एकुण 2200 चौ.मी. क्षेत्राचा मोबदला रक्कम रूपये 5,17,280/- ही गट नंबर 47 पैकीच्या जमीनीतील रेखांकन मंजुरी करणेसाठी आवश्यक विकास खर्चामध्ये वळती करणे व उर्वरीत रक्कम अर्जदाराकडून जमा करून घेणे योग्य होईल.

सबब उपरोक्त आरक्षणाखालील संपूर्ण क्षेत्राचा मोबदला विकास खर्चात वळती करणे व उर्वरीत रक्कम अर्जदाराकडून जमा करून घेणे करीता पूर्ण खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे पडेगांव येथील गट नंबर 47/पैकी जमीन औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार 15 मीटर व 12 मीटर रूंद रस्ता या प्रस्तावाने बाधीत एकुण 2200 चौ.मी. क्षेत्राचा मोबदला रक्कम रूपये 5,17,280/- ही, गट नंबर 47 पैकीच्या जमीनीतील रेखांकन मंजुरी करणेसाठी आवश्यक विकास खर्चामध्ये वळती करणेस व उर्वरीत रक्कम अर्जदाराकडून जमा करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 492 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज, विद्युत, ई. व उद्याने) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.93 मधील रचनाकार कॉलनी येथील बहुउद्देशीय हॉलचे विद्युतीकरण करणेच्या कामाकरीता रक्कम रू.1,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदर काम ई-निविदा द्वारे प्राप्त दरानुसार म्हणजेच 05% कमी दराने उपलब्ध गुत्तेदार यांचेकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची -ड प्रकरण-5 संविदाचे कलम 2(2) नुसार स्थायी समितीच्या मंजुरीनुसार करून घेण्यास्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.93 मधील रचनाकार कॉलनी येथील बहुउद्देशीय हॉलचे विद्युतीकरण करणेचे काम 05% कमी दराने उपलब्ध गुत्तेदारामार्फत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची -ड प्रकरण-5 संविदाचे कलम 2(2) नुसार करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 493 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज, विद्युत, ई. व उद्याने) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.66 विविध ठिकाणी जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन मोठ्या व्यासाची एसडब्ल्युजी ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रू.5,90,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदर काम ई-निविदा द्वारे प्राप्त दरानुसार म्हणजेच 15% कमी दराने उपलब्ध गुत्तेदार ओम जूर सहकारी संस्था यांचेकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची -ड प्रकरण-5 संविदाचे कलम 2(2) नुसार स्थायी समितीच्या मंजुरीनुसार करून घेण्यास्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.66 विविध ठिकाणी जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन मोठ्या व्यासाची एसडब्ल्युजी ड्रेनेज लाईन टाकणेचे काम 15% कमी दराने उपलब्ध गुत्तेदारा ओम मजुर सहकारी संस्था यांचेकडून, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची -ड प्रकरण-5 संविदाचे कलम 2(2) नुसार करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 494 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.98 नक्षत्रवाडी अंतर्गत विविध ठिकाणी उद्यान विकसीत करणे करीता सा.बां. विभागाच्या सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.14,87,901/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास थायी समितीने मान्यता दिली असुन त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकुण 2 निविदा विक्री झाल्या व 1 निविदा दर भरून प्राप्त झाली, ती खालील प्रमाणे.

1. ऋषिकेश कन्स्ट्रक्शन 2.00% कमी दराने

वरील प्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.00% कमी दराची निविदा ऋषिकेश कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. मा. आयुक्त यांनी स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

त्यनुसार ऋषिकेश कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 2.00% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.98 नक्षत्रवाडी अंतर्गत विविध ठिकाणी उद्यान विकसीत करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा नुसार ऋषिकेश कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा 2.00% कमी दराने काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 495 :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं.194/1 मयुरपार्क व जाधववाडी येथील महानगरपालिकेच्या मालकीचे मंजुर रेखांकनातील खुल्या जागेचे क्षेत्रफळ 410.00 चौ.मी. असून सदर मंजूर रेखांकनातील प्लॉट धारकाचे 2/3 (दोन तृतीयांश) सदरील जागा व्यायामशाळा चालविण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले असून त्यानुसार सदर मंजुर रेखांकनातील खुली जागा व्यायामशाळेसाठी भाडेतत्वावर सचिव, दर्शन हेल्थ क्लब या संस्थेला शासकीय दरानुसार भाडेपट्ट्याने महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार 30 वर्षासाठी भाडेतत्वावर देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं.194/1 मयुरपार्क व जाधववाडी येथील महानगरपालिकेच्या मालकीचे मंजुर रेखांकनातील खुल्या जागेचे क्षेत्रफळ 410.00 चौ.मी. जागा व्यायामशाळेसाठी, सचिव, दर्शन हेल्थ क्लब या संस्थेला शासकीय दरानुसार भाडेपट्ट्याने महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार 30 वर्षासाठी भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 496 :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.29 अंतर्गत दिल्लीगेट जलकुंभ ते हीनानगर, औरंगाबाद टाईम्स कॉलनी पुलापर्यंत 100, 150, 200 व 300 मी.मी. व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन 2006-07 च्या दरसुची नुसार रक्कम रू.28,44,500/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यास स्थायी समितीचा ठराव क्र.101 दि.31.1.2008 च्या बैठकीत मान्यता झालेली आहे. कामाचा खर्च हा भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षातुन करण्यात येणार आहे. कार्यालयाची निविदा सूचना जा.क्र.210/2008, काढण्यात येवून ई-निविदेद्वारे बी-1 निविदा मागविण्यात आल्या असता निविदा स्विकारण्याच्या निर्धारीत वेळेपर्यंत एकच निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा खालील प्रमाणेची आहे.

1. मे. नुर कन्स्ट्रक्शन अं.प. दरापेक्षा 60% जास्त दराने.

वरील प्रमाणे एकच निविदा असुन ती मे.नुर कन्स्ट्रक्शन यांची असून ती अं.प.दरापेक्षा 60% जास्त दराची आहे. मे.लॅन्को इन्डस्ट्रीज लि. यांचे दि.15.2.2008 चे डीआयके पाईपचे मुळ दरात 2% जकात, 4% व्हॅट, 2.3% आय.टी., 1% विमा, 0.5% अनलोडींग, 5% ओव्हरहेड खर्च असे एकुण 14.8% म्हणजेच 15% अधि मिळवून आलेल्या दरानुसार या कामासाठी लागणारा खर्च काढून मुळ निविदा रक्कमेशी तुलना केली असता तो अं.प.दरापेक्षा 53.64% जास्त एवढा येतो. मे.नुर कन्स्ट्रक्शन यांना उक्तदर आपणांस मान्य आहे किंवा कसे याबाबत पत्र देवून विचारणा केली असता त्यांनी दि.27.3.2008 रोजी पत्र देवून 53.64% जास्त दराने काम करण्यास लेखी संमती दिली. त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर ठेवण्याची शिफारस केली आहे.

करीता मे.नुर कन्स्ट्रक्शन यांनी लेखी दिलेल्या संमतीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा 53.64% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.29 अंतर्गत दिल्लीगेट जलकुंभ ते हीनानगर, औरंगाबाद टाईम्स कॉलनी पुलापर्यंत 100, 150, 200 व 300 मी.मी. व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदानुसार व निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम मे. नुर कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा 53.64% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 497 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन नगर विकास शासन निर्णय क्र.संकिर्ण 2006/513/प्र.क्र.90/2009/नवि-20 मंत्रालय, मुंबई 32 दि.20 सप्टेंबर 2006 अन्वये शासन निर्णय घेण्यात आला आहे की, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे (यशदा) यांच्या स्थनिक स्वराज्य संस्थामधील कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

वाढत्या औद्योगिकीकरणाने व नागरीकरणाने निर्माण झालेल्या समस्या हाताळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थामधील कर्मचाऱ्यांना बदलत्या परिस्थिती संदर्भात नविन तंत्रज्ञान, कायद्यातील सुधारणा, प्रशासनातील नवनवीन मुद्दे व महाराष्ट्र नागरी क्षेत्रातील प्रशासन सुदृढ करण्याची बाब लक्षात घेवून

यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, पुणे (यशदा) यांनी नागरी व्यवस्थापन विषयातील पदव्युत्तर पदविका प्रशिक्षण अभ्यासक्रम तयार केला आहे. सदर प्रशिक्षण अभ्यासक्रमास शासनाची मान्यता घेवून त्या करीता दरवर्षी महानगरपालिका/नगरपालिका मधील अधिकारी/कर्मचारी वर्गास अशा प्रशिक्षणास पाठविण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. प्रयेक महानगरपालिकेने आणि **अ** वर्ग नगरपालिकांनी प्रत्येकी 1 लाख लोसंख्येसाठी 1 या प्रमाणात त्यांच्या आस्थापनावरील अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षणार्थी म्हणून यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी (यशदा), पुणे या संस्थेकडे नागरी प्रशासनातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमास प्रशिक्षणार्थीना पाठविण्यास शासनाची हरकत नाही. **ब** वर्ग व **क** वर्ग नगरपालिकांनी त्यांची आर्थिक क्षमता लक्षात घेवून प्रशिक्षणार्थी पाठवावेत.

महानगरपालिकेचे स्वतःचे अधिकारी जेव्हा सहाय्यक आयुक्त/उपायुक्त वा तत्सम पदी पदोन्नत होतील तेव्हा त्यांच्यासाठी हा अभ्यासक्रम आवश्यक राहील. तसेच उप जिल्हाधिकारी संवगातील जे अधिकारी महानगरपालिकेमध्ये उपायुक्त/सहाय्यक आयुक्त या दर्जाच्या पदावर प्रतिनियुक्तीवर येतील तेव्हा त्यांच्यासाठी यशदा मधील सदर प्रशिक्षणाचे तीन विषय एका वर्षात उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

यशदा या प्रशिक्षणासाठी तीन विषयाकरीता प्रत्येक वर्षात एकूण प्रशिक्षणार्थीमध्ये पहिले तीन क्रमांक मिळविणाऱ्यांना तसे प्रमाणपत्र एका अत्युकृष्ट गोपनीय अहवालाच्या समकक्ष मानण्यात येईल. तसेच अशा प्रशिक्षणार्थीना प्रोत्साहनपर एक अतिरिक्त वेतनवाढ देण्यात यावी.

यशदा मधील सदर प्रशिक्षण कालावधी हा कार्यकाल मानण्यात यावा व प्रशिक्षणाची तयारी करण्यासाठी परिवर्तीत रजा देण्यात यावी.

संबंधीत अधिकाऱ्यांनी उपरोक्त फायदे मिळण्यासाठी पदव्युत्तर पदविकेसाठी आवश्यक ते तीन विषय एका वर्षामध्ये पुर्ण करणे आवश्यक राहील.

तसेच सदरील प्रशिक्षण कोर्सची फी (Post Graduate Diploma in Urban Management) करीता रू.1,95,000/- आहे. सदरील खर्च महानगरपालिकातर्फे करण्यास्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

या कोर्ससाठी महानगरपालिका औरंगाबादतर्फे उप आयुक्त (सिडको) तथा कर निर्धारक व संकलक श्री.सोमनाथ शेटे यांच्या नांवाची शिफारस करण्यात येत आहे. करीता वरीलप्रमाणे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी (यशदा), पुणे यांनी तयार केलेल्या, नागरी व्यवस्थापन विषयातील पदव्युत्तर पदविका प्रशिक्षण अभ्यासक्रम प्रशिक्षण (Post Graduate Diploma in Urban Management) कोर्ससाठी महानगरपालिका औरंगाबादतर्फे उप आयुक्त (सिडको) तथा कर निर्धारक व संकलक श्री.सोमनाथ शेटे यांना पाठविण्यास आणि या कोर्ससाठी लागणारी फी रू.1,95,000/- चा खर्च महानगरपालिकातर्फे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 498 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.9 नंदनवन कॉलनी येथील उद्यानात संगीत कारंजा उभारणे करीता सा.बां. विभागाच्या सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.15,99,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर करण्यास्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षा अंतर्गत नवीन उद्याने या लेखा शिर्षा अंतर्गत पान क्र.W 28 अ.क्र.45 अन्वये रू.13.00 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. उर्वरीत 3.00 लक्ष ची तरतुद मनपा अर्थसंकल्प 2008-09 मध्ये उपलब्ध करण्याच्या अधिन राहून अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.15,99,000/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.9 नंदनवन कॉलनी येथील उद्यानात संगीत कारंजा उभारणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.15,99,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 499 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज, विद्युत, ई. व उ.) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीचे वेळी जालना रोडवरील पोलवर उर्जा बचत दिवे बसविणे, केबलचे काम करून घेण्यात आलेले आहे. सदरील काम तातडीने करून घेणे आवश्यक असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदार आर. ई. इलेक्ट्रीकल्स यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात आलेले असून त्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेनुसार रू.2,24,968/- इतका खर्च झालेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची -ड प्रकरण-5 संविदाचे कलम 2(2) नुसार स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीचे वेळी जालना रोडवरील पोलवर उर्जा बचत दिवे बसविणे, केबलचे काम तातडीने करून घेणे आवश्यक असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदार आर. ई. इलेक्ट्रीकल्स यांचेकडून करून घेतलेल्या कामास तसेच यासाठीच्या र.रू.2,24,968/- च्या खर्चास, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची -ड प्रकरण-5 संविदाचे कलम 2(2) नुसार कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 500 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज, विद्युत, ई. व उ.) महानगरपालिका, मंत्रीमंडळ बैठकी निमित्त विमानतळ ते चिकलठाणा पर्यंत जालना रोडवरील स्ट्रीट लाईटच्या खराब झालेल्या केबल बदलण्याचे काम करून घेण्यात आलेले आहे. सदरील काम तातडीने करून घेणे आवश्यक असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदार शांती इलेक्ट्रीकल्स यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात आलेले असून त्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेनुसार रू.2,24,960/- इतका खर्च झालेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची -ड प्रकरण-5 संविदाचे कलम 2(2) नुसार स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंत्रीमंडळ बैठकी निमित्त विमानतळ ते चिकलठाणा पर्यंत जालना रोडवरील स्ट्रीट लाईटच्या खराब झालेल्या केबल बदलण्याचे काम तातडीने करून घेणे आवश्यक असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदार शांती इलेक्ट्रीकल्स यांचेकडून करून घेतलेल्या कामास तसेच यासाठीच्या र.रू.2,24,960/- च्या खर्चास, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची -ड प्रकरण-5 संविदाचे कलम 2(2) नुसार कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 501 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिवाजीनगर, गट नं.126 व 127 सातारा गांव सिडको येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे करीता सा.बां. विभागाच्या सन 2006-07 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.15,49,961/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती सभा दि.5/2/2008 रोजी ठराव क्र.322 अन्वये मान्यता प्राप्त आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एक निविदा विक्री झाली व एक निविदा दर भरून प्राप्त झाली. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

1. रमेश रमाकांतराव आरोळे अं.प.दरापेक्षा 4.89% कमी दराने

वरील प्रमाणे प्राप्त निविदेस मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे. त्यानुसार सदरील काम रमेश रमाकांतराव आरोळे यांच्याकडून अं.प.दरापेक्षा 4.89% कमी दराने करून घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवाजीनगर, गट नं.126 व 127 सातारा गांव सिडको येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे करीता प्राप्त झालेली रमेश रमाकांतराव आरोळे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.89% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 502 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि., विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क कार्यालय, मोंढा या इमारतीमधील आरोग्य केंद्राचे नुतनीकरण करणेसाठी सा.बां.विभागाची दरसूची सन 2006-07 नुसार रक्कम रूपये 14,35,900/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यास स्थायी समितीने ठराव क्र.370 दि. 28.2.2008 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानसार उक्त कामासाठी ई-निविदा मार्फत वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन निविदा मागविल्या असता, निविदा दाखल करण्याच्या शेवटच्या तारखेस तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | ओम मजूर सह. संस्था | 12.34% कमी दराने |
| 2. | मे. हायवे कन्स्ट्रक्शन | 5.19% कमी दराने |
| 3. | श्री शेख जहीर अहमद शेख नासेर | 3.50% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.34% कमी दराची निविदा ओम मजूर सह. संस्था यांची प्राप्त झालेली आहे. मा.आयुक्त यांनी सर्वात कमी दराची निविदा मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे ठेवणेकरीता शिफारस केली आहे. करीता ओम मजूर सह. संस्था यांची अं.प.दरापेक्षा 12.34% कमी दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क कार्यालय, मोंढा या इमारतीमधील आरोग्य केंद्राचे नुतनीकरण करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 12.34% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 503 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.95 पदमपुरा येथील नवी वस्ती मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अस्तित्वातील जुना पुतळा काढून त्या ठिकाणी नवा ब्रॉंझ धातुचा (8 ते 9 फुट उंचीचा) पुतळा बसविण्याचे कामास मा.स्थायी समितीने दि.18.9.2007 रोजी विषय क्रमांक 146 नुसार रू.4.00 लक्ष पर्यंतच्या खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे संहिता प्रकरणातील कलम 5(2)(2) नुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पुतळ्यासाठी दरपत्रके घेतली असता सर्वात कमी दरानुसार चौथरा व पुतळा यासाठी एकत्रित किमान खर्च रू.9,75,000/- एवढा अपेक्षीत आहे.

त्यानुसार वाढीव खर्चासाठी दि.31.1.2008 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक 105 अन्वये रू.4.80 लक्ष एवढी तरतुद उपलब्ध करून दिलेली आहे. याशिवाय स.नगरसेवक श्री.गजानन बारवाल यांनी त्यांचे स्वेच्छा निधितून रू.1.00 लक्ष एवढी रक्कम दिलेली आहे. त्यानुसार वाढीव रक्कमेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार काम करून घेण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे संहिता प्रकरणातील कलम 5(2)(2) नुसार मान्यता झाल्यास काम करून घेण्यासाठी महानगरपालिकेडे यापुर्वी काम केलेल्या शिल्पकारांची नांवे खालील प्रमाणे आहेत.

1. मडिलगेकर्स आर्टस् स्टुडीओ
2. सुरूची आर्टस श्री.उत्तम पाचारणे
3. सुनिलदेवरे
4. मॉडेल आर्ट वर्क्स
5. पवन आर्ट

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे संहिता प्रकरणातील कलम 5(2)(2) नुसार विना निविदा काम करून घेण्याचे अधिकार मा.स्थायी समितीस असल्याने वरील उपलब्ध शिल्पकारांपैकी एकाचे नांवाने आदेश झाल्यास त्यांचेकडून काम करून घेण्यात येइल. त्यानुसार प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय शिरसाट : सदरील पुतळ्याचे काम कला संचालनालयाची मान्यता घेऊन डॉ.आंबेडकर जयंती पुवी म्हणजेच 14 एप्रिल पुर्वी करण्यात यावे.

मा. सभापती : स.सदस्यांच्या सुचनेप्रमाणे 14 एप्रिल पुर्वी काम करून घ्यावे. सदरील काम सुरूची आर्टस श्री.उत्तम पाचारणे यांचेकडून करून घ्यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.95 पदमपुरा येथील नवी वस्ती मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अस्तित्वातील जुना पुतळा काढून त्या ठिकाणी नवा ब्राँझ धातुचा (8 ते 9 फुट उंचीचा) पुतळा बसविण्याचे काम सुरूची आर्टस श्री.उत्तम पाचारणे यांचेकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे संहिता प्रकरणातील कलम 5(2)(2) नुसार विना निविदा काम करून घेण्यास तसेच त्यासाठी लागणाऱ्या एकत्रित रक्कम रू.9,75,000/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 504 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको एन-8 येथे बॉटनिकल गार्डन विकसीत करणे अंतर्गत नेहरू गार्डन येथे विविध कामे करणे करीता सा.बां. विभागाच्या सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.92.40 लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.1262 दि.26.10.2007 रोजीच्या सभेमध्ये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता एकुण 2 निविदा विक्री झाल्या व 2 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | एलोरा कन्स्ट्रक्शन | 8.00% जास्त दराने |
| 2. | एस. के. गोसावी | तांत्रिकदृष्ट्या नाकारण्यात आली. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.00% जास्त दराची निविदा एलोरा कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. त्यानुसार संबंधीत गुत्तेदारास मा.आयुक्त यांच्या दालनात दराबाबतच्या वाटाघाटीस्तव बोलावण्यात आले असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.00% जास्त दराऐवजी अं.प.दरापेक्षा 5% जास्त दराने काम करण्यास संबंधीत गुत्तेदाराने संमती दिलेली आहे. त्यास मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती समोर सादर करणेबाबत शिफारस केलेलीआहे.

त्यानुसार एलोरा कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 8.00% जास्त दीराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-8 येथे बॉटनिकल गार्डन विकसीत करणे अंतर्गत नेहरू गार्डन येथे विविध कामे करणे करीता प्राप्त झालेल्या निविदाधारक एलोरा कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम त्यांचेकडून अं.प.दरापेक्षा 8.00% जास्त दीराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 505:**

कार्यकारी अभियंता (ज.नि., वि.इ. व उ. यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.महापौर, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या दालनाच्या मागील बाजुस कॉन्फरन्स हॉल व वेटींग रूमचे बांधकाम करण्यात आले आहे. सदर कामांतर्गत विद्युत कामे करण्यासाठी सा.बां. खात्याच्या सन 2007-08 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 2,49,733/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. कॉन्फरन्स हॉल व वेटींग रूमच्या स्थापत्य कामा बरोबरच वास्तुविशारद यांनी सुचविल्याप्रमाणे विद्युतीकरणाचे काम करणे गरजेचे होते. यामध्ये हॉल/वेटींग रूम मधील दिवे, पंखे, बेल, संगणक, दुरध्वनी इत्यादींसाठी नवीन कन्सील वायरींग व इतर संलग्न कामे तातडीने करणे गरजेचे होते. जेणे करून स्थापत्य काम विहीत कालावधीत पुर्ण करणे शक्य होईल. करीता उपलब्ध गुत्तेदार मे. बानेश्वर इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचे कडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10% कमी दराने विना निविदा विद्युतीकरणाचे काम करून घेण्यात आले

आहे. त्यानुसार प्रस्ताव मान्यतेसाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

करीता रक्कम रूपये 2,49,733/- चे अंदाजपत्रक व मे.बानेश्वर इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10% कमी दराने पुर्ण करून घेतल्याबद्दल मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5(2(2) अन्वये कार्योत्तर मुंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.महापौर यांच्या दालनाच्या मागील बाजुस बांधण्यात आलेल्या कॉन्फरन्स हॉल व वेटींग रूमचे विद्युत कामांसाठी रक्कम रूपये 2,49,733/- चे अंदाजपत्रकास तसेच विद्युतीकरणाचे काम तातडीने करून घेणे आवश्यक असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदार मे.बानेश्वर इलेक्ट्रीकल्स यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10% कमी दराने करून घेण्यात आलेल्या कामास, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची -ड प्रकरण-5 संविदाचे कलम 2(2) नुसार कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 506 :**

मा. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, सुवर्णजयंती शहरी रोजगार योजने अंतर्गतपुणे महानगरपालिकेने स्थापन केलेल्या स्माईल सेंटरच्या (सावित्री मार्केटींग इन्स्टिट्युट फॉर लेडीज इम्पॉवरमेंट) धर्तीवर औरंगाबाद येथे महानगरपालिकेतर्फे सेंटर सुरू करणे आहे. सदर केंद्र म्हणजे शहरातील मध्यवर्ती भागातील शौरूम अथवा विक्री केंद्र असते. ज्यामध्ये महिलांनी तयार केलेल्या वस्तु/पदार्थ, साहित्य, खेळणी, कपडे, पैठणी, हिमरू शाल, किचैन, अजिंठा वेरूळच्या पेंटींग्ज, स्पटीकाचे दगड, बिदरीच्या कलात्मक वस्तु, हँडीक्राफ्ट, सेवया, पापड, लोणचे, भाजीपाला अशा अनेक वस्तु विक्रीसाठीउपलब्ध असतील. प्राधान्याने दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील महिलांनी व इतर महिलांनी, संस्थांनी, महिला मंडळानी तयार केलेल्या वस्तु त्या ठिकाणी ठेवण्यात येतील. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या गरीब महिलांना उत्पन्न मिळू शकेल. सदर केंद्र स्माईल सेंटर सावित्री मार्केटींग इन्स्टिट्युट ऑफ लेडीज इम्पॉवरमेंट ह्या अनुभवी महिला मंडळास चालविण्यासाठीदेण्यात येईल.

याकरीता महानगरपालिकेच्या मालकीचे मोहल्ला पदमपुरा येथील जय टॉवर ज्याचे न.भु.क्र.19660 असे असून बांधलेल्या इमारतीचे तळघराचे क्षेत्रफळ 596.22 चौ.मी. आहे. ह्या बांधकामाचे 60 वर्षे आयुष्य धरल्यास रू.78,70,104/- मुल्य येते. परंतु सदर बांधकाम 30 वर्षासाठीच संस्थेला द्यावयाची आहे. त्यामुळे 30 वर्षाचे मुल्य रू.39,35,052/- आकारून व दर वर्षास नाममात्र मुल्य रू.1/-आकारून जागा 30 वर्षासाठी स्माईल सेंटर (सावित्री मार्केटींग इन्स्टिट्युट फॉर लेडीज इम्पॉवरमेंट) यांना देणे योग्य.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीचे मोहल्ला पदमपुरा येथील जय टॉवर न.भु.क्र.19660 बांधलेल्या इमारतीचे तळघराचे क्षेत्रफळ 596.22 चौ.मी. मुल्य रू.39,35,052/- आकारून व दर वर्षास नाममात्र मुल्य रू.1/-आकारून जागा 30 वर्षासाठी स्माईल सेंटर (सावित्री मार्केटींग इन्स्टिट्युट फॉर लेडीज इम्पॉवरमेंट) यांना देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 507 :**

मा. आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिडको विभागासाठी विकेंद्रीभुत किटकनाशक व अळीनाशक फवारणी व फॉगींगसाठी प्रभाग क्र.1 ते 6 साठी ई-टेंडर द्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरील निविदा दि.28.9.2007 रोजी उघडण्यात आल्या होत्या व वाटाघाटीनंतर त्यांचे अंतिम दर सर्वात कमी मा.स्थायी समितीच्या मंजुरीनुसार 1 जानेवारी 2008 ते 31 मार्च 2008 या कलावधी करीता प्रभाग निहाय खालील कंत्राटदारांना कार्यादेश देण्यात आले होते.

| प्रभाग क्रमांक | कंत्राटदाराचे नांव | प्रभागाची किंमत रूपये | लावलेली बोली रूपये | एकूण रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| 1. | भारत पेस्ट कंट्रोल | **84,915/-** | **15,607/-** | **1,00,522/-** |
| 2. | सचिन पेस्ट कंट्रोल | **84,915/-** | **15,607/-** | **1,00,522/-** |
| 3. | आर.डी. पेस्ट कंट्रोल | **84,915/-** | **15,607/-** | **1,00,522/-** |
| 4. | पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल | **84,915/-** | **15,607/-** | **1,00,522/-** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5. | निलेश पेस्ट कंट्रोल | **84,915/-** | **15,607/-** | **1,00,522/-** |
| 6. | ओंकारेश्वर सुशिक्षित बेरोजगार संस्था | **84,915/-** | **15,607/-** | **1,00,522/-** |

वरील कंत्राटदारांना दिलेल्या कार्यादेशाची मुदत दि.31 मार्च 2008 रोजी संपत आहे. नागरीकांचे आरोग्य लक्षात घेता पुर्वीच्याच कंत्राटदारामार्फत काम 1 एप्रिल 2008 ते 30 जुन 2008 पर्यंत चालू राहण्याकरीता स्थायी समितीचे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको विभागासाठी विकेंद्रीभुत किटकनाशक व अळीनाशक फवारणी व फॉगींगसाठी पुर्वीच्याच कंत्राटदारामार्फत काम 1 एप्रिल 2008 ते 30 जुन 2008 पर्यंत पुर्वीच्या मंजुर दरानुसार करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| प्रभाग क्रमांक | कंत्राटदाराचे नांव | प्रभागाची किंमत रूपये | लावलेली बोली रूपये | एकुण रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| 1. | भारत पेस्ट कंट्रोल | **84,915/-** | **15,607/-** | **1,00,522/-** |
| 2. | सचिन पेस्ट कंट्रोल | **84,915/-** | **15,607/-** | **1,00,522/-** |
| 3. | आर.डी. पेस्ट कंट्रोल | **84,915/-** | **15,607/-** | **1,00,522/-** |
| 4. | पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल | **84,915/-** | **15,607/-** | **1,00,522/-** |
| 5. | निलेश पेस्ट कंट्रोल | **84,915/-** | **15,607/-** | **1,00,522/-** |
| 6. | ओंकारेश्वर सुशिक्षित बेरोजगार संस्था | **84,915/-** | **15,607/-** | **1,00,522/-** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 508 :**

मा.आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडको विभागासाठी विकेंद्रीभुत घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रभाग क्र.1 ते 10 करीता ई-टेंडरद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यात प्रभाग 1 ते 10 करीता सदरील निविदा दि.6.12.2007 रोजी उघडण्यात आल्या व वाटाघाटीनंतर दि.27.12.2007 रोजी त्याचे दर अंतिम करण्यात आले. पात्र निविदामधून सर्वात कमी दर असलेल्या निविदाधारकांना दि.17.1.2008 रोजी मा.स्थायी समितीच्या मंजुरीनुसार दिनांक 01 जानेवारी 2008 ते 31 मार्च 2008 या कालावधी करीता प्रभाग निहाय खालील कंत्राटदारांना कार्यादेश देण्यात आले होते.

| प्रभाग क्र. | सर्वात कमी दर असलेल्या कंत्राटदाराचे नांव | लावलेली बोली | प्रभागातील किंमत रूपये | कंत्राटदारांना द्यावयाची एकुण रक्कम रू./प्रतिमाह |
|---|---|---|---|---|
| 1. | पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल | 38.99% | 1,56,020.00 | 2,16,852/- |
| 2. | जे. एच. मिर्झा | 37.07% | 1,56,020.00 | 2,13,856/- |
| 3. | अनिकेत कन्स्ट्रक्शन | 37.90% | 1,84,580.00 | 2,54,535/- |
| 4. | परफेक्ट हाऊस किपींग | 37.71% | 1,77,440.00 | 2,44,352/- |
| 5. | व्ही. जी. स्वामी | 39.05% | 1,63,160.00 | 2,26,874/- |
| 6. | निलेश लेबर सप्लायर्स | 36.20% | 1,23,890.00 | 1,68,738/- |
| 7. | निलेश लेबर सप्लायर्स | 36.10% | 1,16,750.00 | 1,58,897/- |
| 8. | ईश्वरलाल खरे | 39.05% | 1,31,030.00 | 1,82,197/- |
| 9. | के. एम. सुरे | 39.22% | 1,43,520.00 | 1,99,808/- |
| 10. | निलेश लेबर सप्लायर्स | 39.38% | 1,47,090.00 | 2,05,014/- |
| | | | एकुण - | **20,71,123/-** |

वरील कंत्राटदारांना दिलेल्या कार्यादेशाची मुदत दि. 31 मार्च 2008 रोजी संपत आहे. साफसफाईचे पुढील काम मे. रामके इन्व्हार्वो इंजिनियर्स, हैद्राबाद यांना देण्यात आले होते. परंतु अद्याप पर्यंत त्यांचे काम सुरू न झाल्यामुळे नागरीकांचे आरोग्य लक्षात घेता पुर्वीच्याच कंत्राटदारामार्फत साफसफाईचे काम 1 एप्रिल 2008 ते 30 जुन 2008 पर्यंत चालू राहण्याकरीता स्थायी समितीचे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

मा.आयुक्त : जो काही प्रस्ताव महापालिकेने तयार केला होता त्यास कार्यवाही होण्यासाठी आणखी दोन तीन महिणे लागतील त्यासाठी ज्या दोन प्रभाग कार्यालय ड , ब चे स्वच्छतेच्या काम करणा-या एजन्सीला पुढील दोन किंवा तीन महिण्याची मुदतीचा प्रस्ताव आहे मंजूर करावा.

| | |
|---|---|
| श्री.अ.रशीद खान | : कचरा साठी 12 कोटी खर्च येणार आहे त्या संबधीत पुढे काय कार्यवाही केली. त्या वर स्टे आहे काय? |
| मा.आयुक्त | करारनामा झालेला नाही शासनाने त्याबद्दलची माहिती मागविलेली आहे. |
| श्री.अ.रशिद खान | : जो पर्यत करारनामा होत नाही तोपर्यत या एजन्सीला मुदतवाढ दयावी. |
| श्री.वसंत नरवडे | : ज्या एजन्सीला मुदतवाढ देतो आहे त्या एजन्सीचे काम चांगले आहे काय प्रशासनाने कधी पाहणी केली काय ? साफसफाई होत नाही त्यांचे बिल मिळत नाही म्हणून त्यांनी लेबर कमी केले नगरसेवकांच्या घराजवळील दोन चार गल्लीचे स्वच्छता केली की बाकीचे ठिकाणी अस्वच्छता दिसून येते. त्या एजन्सीच्या कामावर कुणाचेही नियंत्रण नाही. |
| मा.आयुक्त | : वार्ड अधिकारी तसेच आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे कन्ट्रोल असायला पाहिजे तशा सुचना देण्यात येतील. |
| श्री.वसंत नरवडे | : शहरातील अनेक नाले गच्च भरलेले आहे दुर्गधी सुटली आहे.नाल्यात मच्छर डास होवू नये म्ळणून औषधी टाकली जाते दोन वर्षापासून ती नाही.नाल्याच्या साईडला असलेल्या सर्वच घरामध्ये मोठया प्रमाणात मच्छर आहे. |
| मा.आयुक्त | : शासनाकडून मिळत् काही महिण्यापासून मिळालेले नाही. |
| श्री.पुरूषोत्तम ठाकूर | :उष्णतेच्या दिवसात दुर्गधी मूळे मच्छर डास माशा मोठया प्रमाणात होणार आहे. यावर नियंत्रण राहण्यासाठी आवश्यक ती औषधी खरेदी करावी. |
| श्री.वसंत नरवडे | : फोगींग मशीनला पुरेसे डिझेल नसते एक मशीलन 15-20 घरामध्ये फवारणी करते ते कर्मचारी बंद करून निघून जातात. |
| श्री.अ.रशिद खान | : जे डिझेल दिले जाते ते पुरेशे द्यावे. फोगींग मशीनने मच्छर तीन कि.मीटर पर्यत जाते. घर बंद करून फवारणी केली पाहिजे खुल्या जागेत फवारणी होते योग्य वाटत नाही. 12 वर्षापूर्वीच्या फवारणी मशीन आहेत नवीन मशीन खरेदी करून कार्यवाही करावी. |
| मा.आयुक्त | :आरोग्य वैद्य अधिकारी यांनी माहिती घेवून संचिका सादर करावी कार्यवाही केली जाईल. |
| श्री.पुरूषोत्तम ठाकूर | : फोगींग मशीन खरेदीसाठी स्वच्छानिधीतून परवानगी द्यावी. |
| श्री.संजय सिरसाट | : घंटा गाडया खराब झालेल्या आहेत. कार्यवाही होण्यास चार महिणे लागत असतील तर नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून खरेदी करण्याचे अधिकार वार्ड अधिकारी यांना दयावे सर्वांची सम्मती राहिल.घंटा गाडी वार्डात असायलाच पाहिजे. |
| मा.आयुक्त | : एक महिण्यात खरेदी करू शकलो नाही तर ठेकेदाराच्या मार्फत येतील त्यात खर्च गृहीत धरलेला आहे. |
| श्री.संजय सिरसाट | : वार्ड स्वच्छता एजन्सीला तीन महिण्याची मुदत देत आहोत तीन महिणे गाडया येणार नाही असे गृहीत आहे. |
| मा.आयुत | : मोठी गाडी ट्रान्स्पोटेशनची कचरा क्लोक करण्याची महिण्यापर्यत येणार नाही.कारण कन्स्ट्रक्शनला बॉडी बिल्डींगला वेळ लागतो. घंटागाडी कचरा कुंडी लवकरच येतील. |
| श्री.अ.रशिद खान | : त्याच एजन्सीला मुदतवाढ देण्या ऐवजी टेंडर का काढले जात नाही. |
| मा.आयुक्त | : एक महिण्या नवीन ठिक्ाणी काम सुरू होईल अशी अपेक्षा आहे. |
| श्री.पुरूषोत्तम ठाकूर | : दोन वर्षापासून कचरा उचलण्यासाठी कन्टेनर येणार म्हणून कचरा कुडया आणल्या जात नाही. केंव्हा येणार आहे. |
| मा.आयुक्त | : टेंडर दिले ते शेवटच्या स्टेजवर आहे. |
| मा.सभापती | :मजुरी देण्यात येते. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको विभागासाठी विकेंद्रीभुत घनकचरा व्यवस्थापनासाठी सिउकोतील प्रभाग 1 ते 10 मधील साफसफाईचे काम खाली दर्शविलेल्या मंजुर दरानुसार पुर्वीच्याच कंत्राटदारामार्फत साफसफाईचे काम 1 एप्रिल 2008 ते 30 जुन 2008 पर्यंत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| प्रभाग | सर्वात कमी दर असलेल्या | लावलेली बोली | प्रभागातील किंमत | कंत्राटदारांना |
|---|---|---|---|---|

| क्र. | कंत्राटदाराचे नांव | | रूपये | द्यावयाची एकूण रक्कम रू./प्रतिमाह |
|---|---|---|---|---|
| 1. | पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल | 38.99% | 1,56,020.00 | 2,16,852/- |
| 2. | जे. एच. मिर्झा | 37.07% | 1,56,020.00 | 2,13,856/- |
| 3. | अनिकेत कन्स्ट्रक्शन | 37.90% | 1,84,580.00 | 2,54,535/- |
| 4. | परफेक्ट हाऊस किपींग | 37.71% | 1,77,440.00 | 2,44,352/- |
| 5. | व्ही. जी. स्वामी | 39.05% | 1,63,160.00 | 2,26,874/- |
| 6. | निलेश लेबर सप्लायर्स | 36.20% | 1,23,890.00 | 1,68,738/- |
| 7. | निलेश लेबर सप्लायर्स | 36.10% | 1,16,750.00 | 1,58,897/- |
| 8. | ईश्वरलाल खरे | 39.05% | 1,31,030.00 | 1,82,197/- |
| 9. | के. एम. सुरे | 39.22% | 1,43,520.00 | 1,99,808/- |
| 10. | निलेश लेबर सप्लायर्स | 39.38% | 1,47,090.00 | 2,05,014/- |
| | | | एकूण - | **20,71,123/-** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 509 :**

मा.आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड-ड प्रभागाचे घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम 2000 अंतर्गत साफसफाई व डोअर टु डोअर कलेक्शनसाठी तीन (3) विभागात (अे/बी/सी) विभाजन करून दि. 1 सप्टेंबर 2006 पासून खाजगीकरणाच्या माध्यमातून खालील कंत्राटदारांना 1 वर्षासाठी कंत्राट देण्यात आले होते.

| विभाग | साफसफाईसाठी कंत्राटदाराचे नांव | डोअर टु डोअर कलेक्शनसाठी कंत्राटदाराचे नांव |
|---|---|---|
| अे | ईश्वरलाल खरे | जागृती एंटरप्रायजेस |
| बी | मोना लेबर सप्लायर्स | मोना लेबर सप्लायर्स |
| सी | सेंटर फॉर डेव्हलपमेंट | सेंटर फॉर डेव्हलपमेंट |

या कंत्राटाची मुदत दि. 30 ऑगस्ट 2007 रोजी संपलेली होती. दि. 23.10.2007 रोजी मा.स्थायी समितीच्या मंजुरीनुसार वरील कंत्राटदारांना दि.1.9.2007 ते 29.2.2008 या कालावधी करीता मुदतवाढ देण्यात आली होती. सदरील कंत्राटदारांची मुदत पुन्हा दि.29.2.2008 रोजी संपलेली आहे. नागरीकांचे आरोग्य लक्षात घेता व वॉर्ड-ड प्रभागातील स्वच्छतेचा विचार करता वरील कंत्राटदारांना 1 मार्च 2008 ते 31 मे 2008 या तीन महिन्याच्या कालावधी करीता मुदतवाढ देण्याकरीता स्थायी समितीच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड-ड प्रभागाचे घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम 2000 अंतर्गत साफसफाई व डोअर टु डोअर कलेक्शनचे काम करून घेण्याकरीता, नागरीकांचे आरोग्य लक्षात घेता व वॉर्ड-ड प्रभागातील स्वच्छतेचा विचार करता खाली दर्शविल्यानुसार पुर्वीच्याच कंत्राटदारांना 1 मार्च 2008 ते 31 मे 2008 या तीन महिन्याच्या कालावधी करीता मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| विभाग | साफसफाईसाठी कंत्राटदाराचे नांव | डोअर टु डोअर कलेक्शनसाठी कंत्राटदाराचे नांव |
|---|---|---|
| अे | ईश्वरलाल खरे | जागृती एंटरप्रायजेस |
| बी | मोना लेबर सप्लायर्स | मोना लेबर सप्लायर्स |
| सी | सेंटर फॉर डेव्हलपमेंट | सेंटर फॉर डेव्हलपमेंट |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 510 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेत वॉर्ड कार्यालय कार्यान्वीत झाल्यापासून त्यांची आस्थापना विषयक कामे वॉर्ड कार्यालयाकडे अधिकार प्रदान करून देण्यात आलेले आहेत. तथापि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 48 अन्वये नगर सचिव हे स्थायी समिती व महानगरपालिकेचे (सर्वसाधारण सभा) सचिव असून स्थायी समिती व महानगरपालिकेकडून फर्मावण्यात येणारी तसेच त्यांच्या प्रत्यक्ष हाताखाली काम करणारे अधिकारी, कर्मचारी यांचे कर्तव्ये विहीत करणे, कामावर पर्यवेक्षण, नियंत्रण, सेवा, परिश्रम इ. बाबींचा निकाल करणे तसेच कलम 30, 31 अन्वये नेमलेल्या विविध समिती/विशेष समित्यांची कामे आणि अधिनियमाचे कलम 51 (1), 53 (2), 56(1) (ड), 57 (2), 67 (3) (ब) व इतर तरतुदीप्रमाणे त्यांचे अधिकार व

कर्तव्ये अधिनियमान्वये निहीत केलेले असून वर प्रस्तावित केल्याप्रमाणे आणि फक्त त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांच्या बदल्या व नविन नियुक्त्या तूर्त पुर्वी प्रमाणेच आस्थापना विभागाकडे ठेवून अधिनियमाच्या वरील तरतुदीप्रमाणे पार पाडण्यास अधिकार व कर्तव्ये नगर सचिव यांनी त्यांना प्राधिकृत करण्यास प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 51 (1), 53 (2), 56(1) (ड), 57 (2), 67 (3) (ब) आणि अधिनियमामध्ये नगर सचिव यांचे प्रत्यक्ष हाताखाली काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य विहीत करणे, कामावर पर्यवेक्षण, नियंत्रण, सेवा परिश्रम विशेष अधिकार या संबंधीची सर्व प्रश्नांचा निकाल करणे व यासंबंधत असलेल्या इतर सर्व तरतुदी प्रमाणे अधिनियमाच्या कलम 48(अ), 48(ब), 48(क) व इतर तरतुदीस अधिन राहुन नगरसचिवास यांना सर्व प्रश्न निकाली काढणे संबधी सर्व अधिकार प्रदान करणे व अधिकार व कर्तव्ये पार पाडण्यास प्राधिकृत करणेस, तुर्त फक्त अधिनस्त कर्मचाऱ्यांच्या बदल्या व नविन नियुक्त्या पुर्वी प्रमाणेच कायम ठेवून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 511 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुख्य प्रशासकीय इमारत येथील विधी विभागात पार्टीशन, आस्थापना-2 विभागात रंगकाम, मा.सर्वसाधारण सभा सभागृहाचे रंगकाम दुरूस्ती, प्रभाग समिती अ दालन रंगकाम करणे करीता सा.बां. विभागाच्या सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.1,75,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन कामाची तातडी पाहता काम उपलब्ध गुत्तेदार श्री सुजात अली हाशमी यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात आले असून प्रस्ताव मा.आयुक्त महोदय यांच्याकडे सादर केला असता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड प्रकरण 5 संविदा चे नियम 2 (2) अन्वये मा. आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड प्रकरण 5 संविदा चे नियम 2 (2) अन्वये कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुख्य प्रशासकीय इमारत येथील विधी विभागात पार्टीशन, आस्थापना-2 विभागात रंगकाम, मा.सर्वसाधारण सभा सभागृहाचे रंगकाम दुरूस्ती, प्रभाग समिती अ दालन रंगकाम इ. कामे, उपलब्ध गुत्तेदार श्री सुजात अली हाशमी यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात आलेल्या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड प्रकरण 5 संविदा चे नियम 2 (2) अन्वये कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.मो.जावेद मो.इसाक : शहरात 30-40 लोकांना कुत्रे चावले आहे. घाटी दवाखान्यात येणा-या रूग्णांना लस मिळत नाही. मा.न्यायालयाचे कुत्रे मारण्यास बंदी केली परंतू ते चावतात त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

मा.आयुक्त : दोन महिण्यात 4500 कुत्र्याचे ऑपरेशन केले आहे.पुढील कालावधीतही करीत राहिले तर फरक पडेल असे वाटते.

श्री.अ.रशीद खान : फॅमिली प्लॅनींग केले जाते तेच कुत्रे चावत आहे.नर चावतात मादी चावत नाही

श्री.मो.जावेद मो.इसाक : एक व्यक्तीला 10 दिवसापूर्वी कुत्र्याने चावा घेतला मोकाट कुत्र्यांचा बदोबस्त करणे महापालिकेचे कर्तव्य असते माझे 10 दिवसाचे उत्पन्न बुडाले म्हणून माझे पत्रघेवून त्यांनी मा. आयुक्त यांना आर्थीक मदत मिळण्याची मागणी केलेली आहे

श्री.कचरू मोरे : प्रतापनगर शहानुरवाडी भागात सकाळी जवळपास 50-50 कुत्र्याचे टोळके दिसून येते. बाजूलाच शेतात गहू आहे कुत्रे शेतात माझे नातवास कुत्रा चावलेला आहे. पकडण्यासाठी सकाळी गाडी बोलविली तीन दिवस आले एक पकडतांना दुसरे पळून जातात. पुन्हा गाडी आलीच नाही. असे असतांना गांभीर्याने घेतले जात नाही, हे योग्य नाही.

मा.सभापती : सकाळच्या वेळी कुत्रे पकडण्याची मोहिम राबवावी.

मा.आयुक्त : पकडण्याची कार्यवाही चालू आहे 10-20 टक्के राहिले असेल.ते सर्व पकडले जातील. पकडून फॅमीली प्लॅनीग करणार कारण संख्या वाढवू नये जेथे पकडले तेथे बाकीचे कुत्रे येतात किती आहे हे समजून येते.

श्री.अ.रशिद खान : रात्री 11-00 वाजेच्या नंतर पकडण्याची मोहिम राबवावी.

मा.आयुक्त : आताच म्हटल्या प्रमाणे दोन तीन स्पॉटवर जावून संबधीत अधिकारी यांनी कुत्रे पकडण्याची कार्यवाही करावी रात्रीच्या वेळी मोहिम राबवावी. 10 टक्के राहिले असेल ते पकडावेच लागेल नसता संख्या वाढेल.

श्री.अ.रशिद खान : कोंडवाडा बंद आहे चालू करावा. पकडणा-यांना चावत आहे. नुसते पकडून रस्त्यावर सोडू नये.पूर्ण शहरातून चार कुत्रे पकडले जात आहे अशी स्थिती राहिल्यास गंभीर परीस्थिती होईल.4500 कुत्रे पकडले यात छावनी वाळूज,दौलताबाद येथील संख्या दाखवली यापेक्षा जास्त कुत्रे शहरात आहे. रात्री पकडले तर 100 टक्के कार्यवाही होवू शकेल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : पीरबाजार उस्मानपूरा भागात मांस, मच्छीची दुकाने आहे त्यामूळे रात्री त्या ठिकाणी मोठया प्रमाणात कुत्रे जमा होतात. तसेच शाळेच्या पाठीमागे 60-70 कुत्रे आढळून येतील.अनेक नागरीकांना रस्त्यांने जावू देत नाही. रात्री गाडी आल्यावर थांबत नाही. कुत्रे पिसाळू नये यासाठी काय उपचार केले जातात. 25 टक्के पिसाळलेले कुत्रे आहे.

मा.आयुक्त : जेंव्हा पकडतो त्यावेळी ॲन्टी रेबीजचे नॅशलीरेशन करतो त्याचा इफेक्ट तीन वर्ष राहतो.

मा.सभापती : कुत्रे पकण्यासाठी स.8-00 वाजेच्या अगोदर मोहिम राबवावी.तसेच शहानुरमिया दर्गा, उस्मानपूरा रस्त्यावर कुत्रे पकडण्याची रात्रीच्या वेळी कार्यवाही करावी.तसेच अनेक मोकाट जनावरे शहरात फिरतात त्यासाठी कोडवांडाची व्यवस्था करावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : महापालिकेत जवान यांचेकडून काही कर्मचारी सतत गैरहजर असतांना हजेरी लावण्यात येते. जे कर्मचारी सतत गैरहजर राहत असेल तर प्रशासन काय ॲक्शन घेणार आहे.

मा.आयुक्त : त्यांचेपेक्षा जे ज्येष्ठ असेल ते जर त्यांची गैरहजर असतांना हजेरी लावत असेल तर ॲक्शन घेण्यात येईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : श्री. प्रताप केशव मिसाळ हे सतत तीन वर्षापासून गैरहजर असतात तरी त्यांना पगार दिला जात आहे.

मा.आयुक्त : या संदर्भात विभाग प्रमुख यांनी स्पेशली नाव नोंद करून पूढील महिण्यात सतत चार पाच दिवस व्हिजीट करावी सतत गैरहजर राहत असेल तर त्यांना नोकरीची गरज नाही असे समजून पूढील कार्यवाही करावी.

श्री.संजय शिरसाट : श्री. बावीस्कर हे महापालिकेच्या शाळेत मुख्याध्यापक म्हणुन कार्यरत आहेत. त्यांचेवर ठाणे येथे कौटुंबिक 458 चा गुन्हा आहे. काल निलंबीत केले, आज ते सेवानिवृत्त होत असून त्यांनी दीर्घकाळ सेवा केली. जाते वेळेस त्यांना एकदम निलंबीत करणे योग्य नाही. त्यांनी जे अपील केले आहे त्यास मान्यता द्यावी.

श्री.कचरू मोरे : श्री.बावीस्कर यांनी हे अपील केले. ज्या मुलीवर जो आघात झाला, हुंडाबळी खाली त्यांना अटक झाली. प्रकरण मा.न्यायालयात गेले. त्या संदर्भात प्रशासनाने जी भुमीका घेतली ती बरोबर आहे. तीच भूमिका कायम ठेवावी. श्री.बावीस्कर यांचे पत्नीचा सुध्दा यात समावेश आहे.

श्री.हिंमतराव दाभाडे : त्या मुलीने कशामुळे पोलीसात गुन्हा दाखल केला, खुलासा करावा. एखादा कर्मचारी सेवा करून अशा चुका करीत असेल तर त्यांची बाजू घेवू नये. या प्रकरणात कोर्टात मॅटर चालू आहे. आपल्याला हस्तक्षेप करता येणार नाही.

श्री.संजय शिरसाट : 458 च्या गुन्ह्यात येऊन श्री.बावीस्कर व त्यांची पत्नी यांना दोघांनाही निलंबीत केले हे योग्य आहे. जो निर्णय लागेल तो मा.न्यायालयात लागेल. शिक्षा व्हावी कुणाचे दुमत नाही.

श्री.अ.रशीद खान : कायद्याच्या चौकटीत न बसता श्री.बावीसकर यांचे अपील मंजूर केले तर एकाच प्रकरणात एकाचे अपील मंजूर करून कामावर घेणार, त्यांचे पत्नीच्या संदर्भात काय निर्णय घेणार आहे. कामावर घ्यायचे असेल तर दोन्हीसाठी रूलींग द्यावे लागेल. योग्य विचार करून निर्णय घ्यावा. नसता मा.न्यायालय या समितीवर ठपका ठेवेल.

श्री.हिंमतराव दाभाडे : निणैय घ्यायचा तर दोघांच्या बाबतीत घ्यावा लागेल. नसता त्यांची पत्नी मा.न्यायालयात जाईल. नसता समोरची व्यक्ती कुणी तरी कोआर्त दाद मागेल यात

शंका नाही. 458 च्या गुन्ह्याचा जो पर्यंत निर्णय लागत नाही तोपर्यंत या सभागृहाला कामावर घेण्याचा निर्णय घेता येत नाही.

मा. आयुक्त — या प्रकरणात पोलीस केस झाली व त्यांना अटक करण्यात आली होती. या संदर्भात यापुर्वी स्थायी समिती त्यानंतर सर्वसाधारण सभेत सुध्दा चर्चा झाली होती. संबंधीत मुख्याध्यापक आज म्हणजे आता 6.10 वाजले आहेत म्हणजे ते सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे त्यांचे निलंबन मागे घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(यावेळी मा.सभापती यांचा एक वर्षाचा सभापती पदाचा कार्यकाळ संपल्याने त्यांनी वर्षभरामध्ये स्थायी समितीत मंजुर केलेल्या विकास कामांच्या संदर्भात समयोचित भाषण केले.)

राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

**<u>विषय क्र. 484 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, जाफरगेट या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे या कामाचे अंदाजपत्रक रू.10,19,000/- चे असून या कामाची ई-निविदा विभागातर्फे निविदा मागविण्यात आल्या असता, एकुण 3 निविदापत्रक विक्री झाले व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 3 निविदा दरपत्रक प्राप्त झाले. सदर कामाच्या निविदेचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मुबारक महेबुब पठाण | 5.35% कमी दराने |
| 2. | शेख मसुद शेख अमीन | 5.25% कमी दराने |
| 3. | गायत्री कन्स्ट्रक्शन | 4.00% जास्त दराने |

तुलनात्मकरित्या सर्वात कमी दराची निविदा मुबारक महेबुब पठाण यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.35% कमी दराने आहे. सदर दरास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी मुबारक महेबुब पठाण यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.35% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाफरगेट या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा 5.35% कमी दराची मुबारक महेबुब पठाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.